Feb 2020

DRISHTIKON Journal (UGC Care Listed) Peer Reviewed

श्री वडमाऊली विद्या प्रसारक मंडळ दहिफळ संचलित,

# शाम गदळे कला वरिष्ठ महाविद्यालय, दहिफळ वडमाऊली, बीड

व

# मुर्ती व शिल्प संशोधन संस्था, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने



## मुर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे

# पहिले राष्ट्रीय चर्चासत्र

✲ संपादिका ✲

डॉ. शांता जाधवर

| | | |
|---|---|---|
| ५४. | **गेवराई येथील खंडोबा मंदिर - एक दृष्टिक्षेप**<br>**प्रा.डॉ. सावंत के. डी.** | 208-210 |
| ५५. | **दुर्मिळ चतुर्भुज गरुड शिल्प – धर्मापुरी**<br>**श्री. मयुरेश खडके** | 211-216 |
| ५६. | **हम्पी मंदिर स्थापत्य कला**<br>**मधुकर मुरलीधर काळे** | 217-220 |
| ५७. | **गेवराई येथील खंडोबा मंदिर – एक दृष्टिक्षेप**<br>प्रा.डॉ. सावंत के. डी. | 221-223 |
| ५८. | गणेश प्रतिमांचा उगम व वाटचाल<br>प्रा.डॉ.सोमवंशी एस.आर | 224-227 |
| ५९. | वैद्यनाथाची परळी : एक ऐतिहासिक मागोवा<br>प्रा.डॉ.प्रकाश फड | 228-232 |
| ६०. | उपेक्षित स्त्री इतिहासाचे सर्वकालीन साक्षीदार : सती शिळा,(उस्मानाबाद तालुक्यातील निवडक सतीशीळांच्या संदर्भानुषंगाने)<br>प्रा.डॉ.जयश्री रमेश कुलकर्णी (देशमुख) | 233-237 |
| ६१. | दिघी येथील अंबिका मंदिरातील मूर्तिशिल्पावशेष<br>प्रा.डॉ सोमवंशी एस.आर. | 238-241 |
| ६२. | महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांवरील मूर्तीकलेची वैशिष्ट्ये<br>प्रा.डॉ. कबाडे साईनाथ शंकरराव | 242-245 |
| ६३. | राजतडाग (औरंगाबाद) लेणीतील राजनर्तिका या नृत्यशिल्पपटावर नवा प्रकाश<br>संजय पाईकराव | 246-248 |
| ६४. | लोकमाता सप्तमातृकांचे बहुप्रवाही ऐतिहासिक अन्वेषण<br>प्रा. रामचंद्र घुले, प्रा.डॉ. रमेश गंगथडे | 249-258 |
| ६५. | अजिंठा लेणी एक वैशिष्ट्यपूर्ण शिल्प<br>प्रा.डॉ. फुलचंद दुधभाते | 259-260 |

# उपेक्षित स्त्री इतिहासाचे सर्वकालीन साक्षीदार : सती शिळा,
## (उस्मानाबाद तालुक्यातील निवडक सतीशीळांच्या संदर्भानुषंगाने)

प्रा.डॉ.जयश्री रमेश कुलकर्णी (देशमुख)
इतिहास विभाग प्रमुख
व्यंकटेश महाजन वरिष्ठ
महाविदयालय,उस्मानाबाद

प्रस्तावना :–

ज्याप्रमाणे राष्ट्रहितासाठी किंवा समाजहितासाठी लढताना वीरमरण झालेल्या वीराच्या स्मृती प्रित्यर्थ उभ्या केल्या गेलेल्या शिल्परचनेला/शिळेला वीरगळ म्हटले जाते, त्याप्रमाणे पतीच्या मृत्युनंतर त्याच्या चितेवर स्वतःला मृत्युच्या स्वाधीन करणाऱ्या स्त्रीच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारलेल्या शिल्परचनेला सतीशिळा किंवा सतीवीरगळ असे म्हटले जाते. भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून अशा सती स्त्रीया व त्यांच्या सतीस्मारक सतीगळांचे संदर्भ आपणास मोठया प्रमाणात पहावयास मिळतात. त्यातही महाराष्ट्रात असे इतिहासाचे साक्षीदार विपूल प्रमाणात आढळतात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सापडणाऱ्या या सतीशिळा तत्कालीन स्त्री इतिहासाचे सर्वकालीन साक्षीदार ठरतात.

**अभ्यास क्षेत्र** :– मराठवाडयातील प्राचीन ऐतिहासिक महत्व असलेला उस्मानाबाद जिल्हा विविध, ऐतिहासीक साधनांनी समृध्द आहे. या जिल्हयातील 8 तालुक्यामधील उस्मानाबाद तालुक्यात क्षेत्र भेटी करीत असताना आढळलेल्या सतीशिळांनी मनात निर्माण झालेल्या जिज्ञासेतून याच तालुक्यातील सतीशिळा हे अभ्यास क्षेत्र निवडले.

**संशोधन पध्दती** :– या शोधनिबंधाची मांडणी करताना क्षेत्र सर्वेक्षण, स्थानिकांच्या मुलाखती, दंतकथा, संदर्भ ग्रंथाचा वापर इ. संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

उद्दिष्टे – 1. उस्मानाबाद तालुक्यातील सतीशीळांचे स्वरूप, विविधता याचा अभ्यास करणे 2. उस्मानाबाद तालुक्यातील सतीशीळाचा आणि परिसरातील समकालीन धार्मिक–सामाजिक–सांस्कृतिक स्थितीचा सहसंबंध अभ्यासणे. 3. सदर परिसरातील सतीशीळासंदर्भातील प्रचलित कल्पनांचा अभ्यास करणे व वास्तवाविषयी स्थानिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे. 4. उस्मानाबाद परिसरातील सतीशिळांच्या जतनाविषयी जाणीव निर्माण करणे.

विषय मांडणी :–

सती पध्दती – प्राचीन काळापासुन ते मध्ययुगाच्या अंतापर्यंत भारतात सती पध्दती अस्तित्वात होती. वास्तविक या प्रथेला कोणत्याही धर्मग्रथाचा आधार नव्हता आणि तरीही धर्माच्या नावाखाली भारतातील सर्व प्रांतात ही प्रथा मोठया प्रमाणात प्रचलित होती. विशेषतः राजघराण्यातील, सरदार घराण्यातील किंवा उच्चकुलीन स्त्रीया त्याबरोबरच काही सामान्य स्त्रीयांही[1] आपल्या पतीच्या चितेवर (पतीचा मृत्यु नैसर्गिक असो वा वीरमरण) सती जात असल्याची अनेक उदाहरणे इतिहासाच्या पानोपानी मिळतात. प्राचीन संस्कृत साहित्य, परकीय प्रवास वृत्तांत, शिलालेख यांमधून त्या त्या प्रदेशातील सतीप्रथेचे विधी व विविधता यांची आणि कालानुरूप झालेल्या बदलांची माहिती मिळते. वात्स्यायनाचे कामसूत्र, पदमपुराण, वराहमिहीरची बृहतसंहिता इ. प्राचीन ग्रथात सती प्रथेचे उल्लेख येतात, तर युआनश्वांग, कोंटी, बर्निअर, बार्बोसा, निकोलाय मनुची इ.परदेशी प्रवाशांच्या प्रवासवर्णनात सती प्रसंगाची वर्णने पहावयास मिळतात. यावरून भारतातील सती प्रथेविषयी सखोल माहिती मिळते. त्यावरून प्राचीन काळात पती–पत्नीने विवाहावेळी एकत्र जगण्याची घेतलेली शपथ हे[2] तर मध्ययुगात यावनी/इस्लामी जुलमी राजवटीत स्त्रीयांच्यावर होणार अत्याचार[3] हे सती प्रथेमागील कारण असल्याचे निदर्शनास येते. पण त्याहीपेक्षा सतीप्रथा हे

भारतातील पुरूषप्रधान संस्कृतीचे द्योतक असल्याचे आणि स्त्रीच्या असहाय्यतेचे प्रतिक असल्याचे स्पष्ट होते.

**सतीशिळा / सतीगळ / सतीचा दगड –**

पतीच्या मागे सती जाणाऱ्या सतीचे स्मारक म्हणजे सतीशिळा किंवा सतीगळ किंवा सतीचा दगड[4]. सतीगळाचा आकार देखील वीरगळासारखाच असतो. काहीवेळा तो चौरसाकृती व लहानही असतो. सती शिळेवरही दोन किंवा तीन कप्पे (steps) असतात. क्वचीत चारही असतात. उस्मानाबाद परिसरात बहुतेक दोन कप्प्यांच्या आणि क्वचित तीन कप्प्यांच्या व चौरसाकृती सतीशिळा सापडतात. या सतीशिळांचे अलंकृत वैविध्यपुर्ण किंवा लहान–मोठे असणे कदाचित संबंधित सतीच्या सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक संपन्नतेशी निगडीत असावे.

**सतीशिळांचे स्वरूप :–**

महाराष्ट्रातील सतीशिळा या प्रामुख्याने तीन प्रकारे तयार केलेल्या दिसतात[5]

1. एका चौकोनी शिळेवर स्त्रीचा एक हात, काही वेळा दोन किंवा तीन हात खांद्यापासून कोपरापर्यंत काटकोनात दुमडलेले असतात. त्या हातात बांगडया, बाजुबंद दाखवलेले असतात. हाताच्या वरच्या भागातील चौकोनात स्त्री–पुरूषाची नमस्कार मुद्रेतील, पद्मासनातील किंवा उभी जोडी असते. त्यांच्या डोक्याकडील भागात चंद्र, सुर्य, कलश या प्रतिमा कोरलेल्या असतात.[6] यातील चंद्र –सुर्य कोरण्यामागे त्या सतीची किर्ती "यावच्चंद्र दिवाकरौ" म्हणजे या विश्वात चंद्र–सुर्य असेपर्यंत टिकावी, असा गर्भितार्थ असावा. तर कलश हे मांगल्याचे प्रतिक असावे. एकापेक्षा जास्त हात जर सतीशिळेवर कोरलेले असतील, तर त्या पुरूषाबरोबर त्याच्या एकापेक्षा जास्त स्त्रीया सती गेल्या असा अर्थ होतो.

2. दुसऱ्या प्रकारात वीरगळीमधेच वरच्या कप्प्याला लागून सतीचा हात दाखविलेला असतो. खालच्या कप्प्यात लढाईचा प्रसंग तर वरच्या कप्प्यात आप्सरांसोबत स्वर्गामध्ये दोघं पती–पत्नी दाखविलेले असतात. याचा अर्थ युध्दात वीरमरण आलेल्या योध्दयासोबत सती गेलेल्या स्त्रीची ती सतीशिळा असते.

3. तिसऱ्या प्रकारात वीराच्या मृत्युनंतर त्याची पत्नी सालंकृत होऊन चितेवर चढलेली आणि पतीचे शव मांडीवर घेऊन किंवा त्यांच्या शवावर ओणवी होऊन वसलेली दाखविली जाते. कडेने ज्वाला दाखविल्या जातात. काही सतीशिळांवर हत्ती–घोडे दाखविलेले दिसतात. तर काहीवेळा ती स्त्री घोडयावर वसलेली व कडेने काही स्त्रिया चालत असलेल्या, वाजंत्री किंवा सैनिक दाखविले जातात. तिच्यावर चौऱ्या ढाळतानाही दाखविले जाते. काहीवेळा त्या स्त्रियांच्या हातात कमनडलूचे चिन्हांकन केलेले दिसते. ते सर्वस्व त्यागाचे व दानाचे प्रतिक असावे.

**शिल्प वैशिष्टये :–**

1. प्रत्येक सतीशिळेवर चंद्रसुर्य प्रतिमा कोरलेल्या असतात.
2. सतीशिळेवर सहसा कसलाही संदेश वा शिलालेख कोरलेला नसतो.(काही अपवाद वगळता)
3. सतीशिळा उभट किंवा चौरसाकृती शिळेवर कोरलेल्या असल्या तरी वरच्या बाजुस कलेशाकृती रचना केलेली असते किंवा निमुळता आकार केलेला असतो.
4. बहुतेक सर्व सतीशिळांवर सतीचा आशिर्वाद स्थितीतला हात (अभयमुद्रा) दर्शविलेला असतो.
5. काही सतीशिळांवर वरच्याबाजुस किर्तीमुख कोरलेले असते तर बहुतेक सतीशिळांवर शिवलिंग पूजन दर्शविलेले असते.

**सतीशिळेचे प्रकार** – सती पध्दती व सतीशिळेविषयी memorial stones या ग्रंथात सविस्तर चर्चा केली आहे.[7] या चर्चेच्या आधारे भारतातील सतीशिळेचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात– 1. सहगमन 2. अनुमरण[8]

1. सहगमन – मृत पतीबरोबर त्याच्या शवाला मांडीवर घेऊन चितेवर चढणाऱ्या सतीचे चित्रण सहगमन पध्दतीच्या सतीशिळेवर केलेले दिसते.

2. अनुमरण – रणांगणावर अथवा दुरप्रदेशात मरण पावलेल्या पुरूषाची पत्नी पतीच्या मृत्युच्या बातमीनंतर आपल्या राहत्या गावी आपल्या पतीच्या पादुका घेऊन सती जाताना अनुमरण पध्दतीच्या सतीशिळेवर दर्शविलेले दिसते.

**सतीशिळा : इतिहासाचे साधन** :– सती पध्दतीचा उल्लेख प्राचीन काळापासून ते यादव काळापर्यंत थोडया–फार प्रमाणात येतो. मात्र यादवोत्तर काळात, विशेषतः यावनी प्राबल्याच्या व अत्याचाराच्या काळात सतीचे प्रमाण वेगाने वाढलेले दिसते. त्यामुळे या काळातील मुबलक सतीशिळा भारतभरात आढळून येतात.

सर्वकालीन सतीशिळांचा सर्वांगिण ऐतिहासिकदृष्टया विचार केल्यास त्या पुरूषप्रधान संस्कृतीची साक्ष तर देतातच, पण स्त्रीयांचे त्या त्या काळातील गौणत्व, होणारे दमन, व्यक्तिस्वातंत्र्याचा अभाव, शिक्षण व संधीच्या अभावातून आलेले आर्थिक व इतर बाबतीतील परावलंबित्व, सामाजिक स्थानातून स्त्रीयांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची न्यूनगंडाची भावना, समाजातील समाजविघातक प्रथा परंपरा आणि त्यातून निर्माण झालेल्या अंधश्रध्दा या सर्व गोष्टींचा पट आपल्या डोळयासमोर उभा करतात. धार्मिक नीती–नियमांच्या नावाखाली स्त्रीयांबाबत हजारो वर्ष झालेल्या अन्यायाची साक्ष देतात. कधी स्वच्छेने तर कधी सक्तीने हे सतीत्व नक्कीच तत्कालीन स्त्रीयांवर लादले गेलेले असणार. त्यांच्या उभारलेल्या या स्मारक शिळा/ सतीशिळा पुढील पिढीला प्रेरणा देणाऱ्या, आशिर्वाद देणाऱ्या, कृपाहस्त–वरदहस्त ठेवणाऱ्या, पवित्र स्मृती जागाविणाऱ्या असे वलय त्यांभोवती निर्माण करून प्रत्येक पिढीतील स्त्रीयांची सतीपध्दती विषयीची आदरात्मक मानिसक घडण घडविण्याचे मूर्तिमंत उदाहरण होत.

सतीशिळांमधील विविधतेतून तिथेही असलेला सामाजिक भेदाभेदाचा इतिहास लक्षात येतो. अतिशय लहान साध्या, ओबडधोबड, केवळ सतीचा हात असलेल्या सतीशिळा सामान्य स्तरातील सतीच्या तर कलाकुसरयुक्त, भव्य, कोरीव, विविध चिन्हांकित, अनेक टप्प्यांच्या व सतीच्या अलंकृत प्रतिमा असलेल्या सतीशिळा या श्रीमंत प्रतिष्ठीत घराण्यातील सती स्त्रीच्या स्मारणार्थ कोरलेल्या असाव्यात हे स्पष्ट होते.

**उस्मानाबाद तालुका व परिसरातील सतीशिळा** :–

भारतीय संस्कृतीत उल्लेखिल्या गेलेल्या स्मारकाशिळा मराठवाडयात मोठया प्रमाणात आढळतात. महाराष्ट्र व कर्नाटकामध्ये अशा स्मारकाशिळांना वीरगळ अथवा कांदळ म्हटले जाते.[9] अशा वीरयोध्दया सोबत सहगमन करणाऱ्या सतीच्या स्मरणार्थ सतीशिळा उभारत. महाराष्ट्रात कोल्हापूर, सोलापूर, उस्मानाबाद, सातारा या जिल्हयात अशा स्मारकशिळा मोठया प्रमाणात उभारल्याचे आढळते.[10] महाराष्ट्र गॅझेटियर मधील या उल्लेखावरून उस्मानाबाद जिल्हयात वीरगळांबरोबरच सतीगळ/ सतीशिळांचे प्रमाण बाहुल्य असल्याचे स्पष्ट होते. प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणावेळीही हे सप्रमाण सिध्द झाले. उस्मानाबाद तालुक्यातील एकुण 110 गावे व वाडयांमध्ये जागोजागी विखुरलेल्या या स्मारकाशिळांमध्ये सतीशिळांचे प्रमाण आणि वैविध्य तसे कमी प्रमाणात आढळते. (वीरगळांच्या तुलनेत) बहुतांश सतीशिळा या हात किंवा हातखंबा पध्दतीच्या असलेल्या दिसतात. यावरून या परिसरात अनेक सामान्य स्त्रीया सती गेल्या असाव्यात असे दिसते. या सतीशिळा यादवोत्तर काळातील मुस्लिम राजवटीच्या काळातील असाव्यात. कारण मुस्लिम राजवटीच्या काळात विशेषतः निजामशाहीत स्त्रीयांचे जीवन असुरक्षित व [illegible] बंदिस्त झालेले होते. त्यातूनच पतीच्या माग शील रक्षणार्थ सती जाण्याची

मानसिकता येथील स्त्रियांमध्ये दिसते. याशिवाय मराठवाडयाचे मध्ययुगातील शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक मागासलेपणही यातून प्रतिबिंबीत होते. वैचारिक मागासलेपणातून या सतीशिळांविषयीचे अनेक गैरसमज आजही येथील खेडयांमध्ये आढळून येतात.

उस्मानाबाद तालुक्यातील लासोना, येवती, मेंढा, कोंड, जागजी, पाडोळी(आ), कणगरा, नितळी, चिखली, राजुरी, आंबेजवळगा, कौडगांव, जुनोनी, बेगडा, खानापूर, वरवंटी, बावी, भंडारी, धारूर, मेडसिंगा, बामणीवाडी, कसबे तडवळा, रूई, दारफळ, तेर, खेड, गोवर्धनवाडी, भंडारवाडी, वाघोली, खामगांव व उस्मानाबाद शहर या ठिकाणी बऱ्याच सतीशिळा सापडल्या. याचा अर्थ इतर गांवामध्ये त्या नव्हत्या असे नाही, तर त्या काळाच्या ओघात नष्ट किंवा भग्न झाल्या किंवा तेथील ग्रामस्थानी अज्ञानातून त्या एक तर जलाशयात विसर्जित केल्या, नाही तर त्यावरील शिवलिंग पाहून शिवमंदिराच्या पायामध्ये घातल्या. या बाबतीत तेथील ग्रामस्थांशी चर्चा करता लक्षात आले की, कोणालाही या स्मारकाशिळांचे प्रयोजन त्यामागील इतिहास माहीत नाही. या संदर्भातील कागदोपत्री पुरावे नसल्याने ही माहिती कधी उजेडातच आली नाही आणि कालोघात या संदर्भातील symbolism, mythology विस्मृतीत गेल्याने या इतिहासाच्या अस्सल साधनाचे महत्व दुर्लक्षिले गेले. या परिसरातील उपेक्षित स्त्री इतिहास या सतीशिळांप्रमाणेच दुर्लक्षित राहिला. सगळयात महत्वाचे म्हणजे पुरूषप्रधान संस्कृतीच्या व सामाजिकतेच्या वर्चस्वातून या सतीशिळांवर पुरूषप्रधान संस्कारही काही ठिकाणी झाले. सतीचा हात असलेल्या सतीशिळांना कोण्या महाराज–बुवांची कथा जोडली गेली तो त्यांचा वरदहस्त, गावावरील कृपाहस्त असल्याचे सांगणाऱ्या, स्थानमहात्म्य वाढविणाऱ्या दंतकथा प्रचलित झाल्या. काही ठिकाणी त्यांची स्थापना मंदिरामध्ये झाली, पण ती पुरूष महात्म्याच्या नावाने! उदाहरणच घ्यायचे झाल्यास उस्मानाबाद पासून 8–9 किलोमिटर अंतरावर असलेल्या वरवंटी गावात भग्न झालेली सतीशिळा मारूती मंदिराच्या पारावर प्रस्थापित करण्यात आली व त्यावर हातबाबा असे नामकरण करण्यात आले. (सतीच्या हातातील बांगडया स्पष्ट दिसत असुनही). तर नितळी जवळील एका सतीशिळेबाबत गावाला अन्नधान्याची मदत करणाऱ्या साधूबुवांचा वरदहस्त असल्याचे सांगितले गेले.

सारांश :–

उस्मानाबाद परिसरातील विविध गावे व वाडयांमध्ये असलेल्या सतीशिळांमध्ये विपुलता आहे, पण फारशी विविधता, अलंकरण, कोरीवपणा, भव्यता दिसुन येत नाही. यावरून या भागात सती जाणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण बरेच होते. पण शिल्प, कला, आर्थिक संपन्नता, सांस्कृतिकता याबाबत आणि स्त्रीयांच्या सामाजिक स्थानाबाबत तेथे मागासलेपण असल्याचे दिसते. समाजात प्रदीर्घ काळापासून परूषप्रधानता, स्त्रीयांबाबत गौणस्थान व वैचारिक मागासलेपण असून अंधश्रध्दा, कर्मठपणा यांचे प्राबल्य जास्त असलेले दिसते. त्यामुळेच सतीशिळांच्या निर्मितीकाळापासून ते वर्तमानकाळातील त्यांच्या जतनापर्यंत दुर्लक्षितता जाणवते. या भागातील या भौतिक साधनांचे संकलन – जतन करून, संदर्भित लिखित साधनांच्या आधारे पडताळणी करून इतिहास लेखन केल्यास समकालीन उपेक्षित स्त्री इतिहास प्रकाशात येईल.

संदर्भ सूची :–

1. विकासपीडियाः इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, हैद्राबाद –CDAC
2. कित्ता
3. श्री. अनिल दुधाणे – इतिहासाचे मुक साक्षीदार :वीरगळ आणि सतीशिळा– मराठीदेशा फाऊंडेशन, पुणे 2020 प्रथमावृत्ती– पृष्ठ कं. 231

4. प्रा.डॉ.संजय वाघमारे– सोलापूर जिल्हयातील वीरगळांची विविधता (काळानुसार – इतिहासाचे एक साधन) पी.एचडी शोधप्रबंध – सोलापूर विद्यापीठ सोलापूर 2011– पृष्ठ कं. 13.
5. श्री. अनिल दुधाणे – इतिहासाचे मुक साक्षीदार :वीरगळ आणि सतीशिळा– मराठीदेशा फाऊंडेशन, पुणे 2020 प्रथमावृत्ती– पृष्ठ कं. 233
6. कित्ता
7. S. Settar, G.D. Sontheimer- memorial stones: A study of their origin, significance and variety – Institute of Indian Art History, Karnataka University, Dharwad. Page No. 277-281.
8. प्रा.डॉ.संजय वाघमारे– सोलापूर जिल्हयातील वीरगळांची विविधता (काळानुसार – इतिहासाचे एक साधन) पी.एचडी शोधप्रबंध – सोलापूर विद्यापीठ सोलापूर 2011– पृष्ठ कं. 14
9. डॉ. अ.प्र.जामखेडकर– संपादक. डॉ.अ.शं. पाठक– महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर– महाराष्ट्रः इतिहास– प्राचीन काळ (खंड 1, भाग 2) स्थापत्य व कला – दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई 2002 – पृष्ठ कं. 268
10. कित्ता